# वसुलीचे परिशिष्ट

## सौदामिनी सहकारी गृहरचना संस्थांचा सहकारी संघ मर्या. कोथरुड, पुणे.

चौकशी क्रमांक : १४४१/२०२३

वसुलीच्या परिशिष्ठामध्ये नमुद असलेल्या अपचारींकडून रक्कम १५ टक्के व्याजाने गैरव्यवहार झाल्याच्या दिनांकापासून वसूल करण्याचे आदेश पारीत केलेला आहे. त्या दोषींची नावे आणि रक्कम पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | नांव | रक्कम |
|---|---|---|
| ०१. | श्री. दत्तात्रय बाबुराव चोंधे | ३,५९,६१५/- |
| ०२. | श्री. जितेंद्र रामकृष्ण पवार | ३,५९,६१५/- |
| ०३ | श्री. अमीत अशोक पोहणकर | ३,५९,६१५/- |
| ०४. | श्री. विजय नारायण बांधल | ३,५९,६१५/- |
| ०५. | श्री. गिरीश बन्सीधर कुलकर्णी | ३,५९,६१५/- |
| ०६. | श्री. योगेश दिलीप पानसे | ३,५९,६१५/- |
| ०७. | श्री. किशोर भालचंद्र आढाव | ३,५९,६१५/- |
| ०८. | श्री. राजेंद्र हिंदुराव भोसले | ३,५९,६१५/- |
| ०९. | श्री. विनायक यशवंत शरकुडे | ३,५९,६१९/- |
| | एकूण | ३२,३६,५३९/- |

(अक्षरी रूपये बत्तीस लाख छत्तीस हजार पाचशे एकोणचाळीस फक्त)

सदर्हू आदेश दि. २७/०१/२०२४ रोजी पुणे मुक्कामी माझे सही शिक्क्यानिशी पारीत केला आहे.

ठिकाणी : पुणे

दिनांक : २७/०१/२०२४

प्राधिकृत चौकशी अधिकारी क. ८३/८८ ॲड. आर. वी. खोंड

-sd-

ॲड. आर.वी.खोंड
प्राधिकृत चौकशी अधिकारी,
कलम ८८
सौदामिनी सहकारी गृहरचना संस्थांचा
सहकारी संघ मर्या. कोथरुड, पुणे.

True copy
BLO
01.02.24
Page No. 01-4009
[9]

(6)

# सौदामिनी सहकारी गृहरचना संस्थांचा सहकारी संघ मर्या. कोथरुड, पुणे,

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे

कलम ८८ अन्वये

# चौकशी अहवाल

# सौदामिनी सहकारी गृहरचना संस्थांचा सहकारी संघ मर्या.
# कोथरूड, पुणे

### महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत

## ** चौकशी अहवाल **

**प्रस्तावना :**

**सौदामिनी सहकारी गृहरचना संस्थांचा सहकारी संघ मर्या. कोथरूड, पुणे.** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणी केलेली आहे. यापुढे सोईसाठी 'सदर संस्था' असा उल्लेख करण्यात आलेला आहे. सदर संस्थेचे कामकाज, व्यवस्थापन तसेच सर्व प्रकारचे व्यवहार इत्यादी बाबी ह्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अंतर्गत शासनाने वेळोवेळी घालुन दिलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे व शासनाने निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार तथा आदेशानुसार व उपविधीतील तरतुदीनुसार करणे बंधनकारक आहे.

सदर संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत चौकशी करण्याकरीता आदेशामध्ये बदल करून माझी प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून मा.उपनिबंधक सहकारी संस्था,पुणे शहर-१,पुणे यांनी दि.२६/०९/२०23 रोजी नेमणूक केलेली आहे. आदेशासोबत परीशिष्ट 'अ' दिलेले आहे. सदर संस्थेचे श्री. ज्ञा.प्र. टेकवडे, विशेष लेखापरिक्षक,वर्ग-१ सहकारी संस्था, पुणे यांनी चाचणी लेखापरिक्षण करून चाचणी लेखापरिक्षण अहवाल सादर केला आहे. त्या अहवालावर श्री. अॅड. धनंजय सिंहासने यांनी सदर संस्थेची कलम-८३ ची चौकशी केलेली आहे.त्यावर सदरची चौकशी ही अवलंबून आहे. चाचणी लेखापरिक्षण अहवालातील व कलम-८३ च्या चौकशी अहवालातील गंभीर दोष, परिशिष्ट-अ मधील मुद्यांवरुन कोण दोषी आहे हे निश्चित केले आहे.

सदर संस्थेचे संबंधित अधिकारी / पदाधिकारी तसेच कर्मचारी यांनी जो गैरव्यवहार व्या अफरातफर केलेली आहे त्यामुळे संस्थेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. हे नुकसान झालेले आहे याची खात्री म्हणून अधिनियमातील कलम ८८ अन्वये चौकशीचे आदेश दिलेले आहेत. ज्यांनी संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये भाग घेतला तसेच संस्थेच्या कर्मचाऱ्यांना आदेशीत केले त्यांचेवर जबाबदारी निश्चित केली आहे.

सदर संस्थेची चौकशी पूर्ण करून मी हा अहवाल आपणास सादर करीत आहे.

## भाग पहिला

**A] परिशिष्ट - अ :**

१) परिशिष्ट-अ मध्ये दिलेल्या मुद्द्यानुसार संस्थेच्या सदर परिशिष्ट हे अहवालावरुन तयार केलेले आहे. सदर परिशिष्टाला **निशाणी क्र. ०२** देण्यात आलेला आहे. सदर परिशिष्टामध्ये **एकूण ०४ मुद्दे** आहेत. सदर मुद्दे हे गैरकानुनी मानधन, कार्यालयीन बांधकाम खर्च व पार्कीगचे पैसे याचे सविस्तरपणे वर्णन हे मुद्दयांमध्ये नमुद आहे.

**B] नियम ७२ (२) नुसार नोटीस :**

सदर चौकशीमध्ये प्रथमदर्शनी सर्व अधिकारी, पदाधिकारी, संचालक,कर्मचारी यांना नोटीस देवून त्यांचे काय म्हणणे आहे हे लेखी स्वरुपामध्ये देण्यास त्यांना फर्माविले आहे. सदर नोटीस ही **दि. ११/१०/२०२३** रोजीची दिली आहे. सदरच्या नोटीस ह्या निशाणी क्रमांक १ वर आहेत. या नोटीस मध्ये संस्थेच्या नुकसानीस आपणास जबाबदार कां धरण्यात येवू नये याबाबतचा लेखी स्वरुपामध्ये खुलासा मागीतला आहे. ज्यांनी अधिकाराचा गैरवापर करुन संस्थेचे नुकसान केलेले आहे त्याचप्रमाणे कर्तव्याचे पालन न केल्यामुळे संस्थेचे नुकसान झाले आहे, त्यांना लेखी स्वरुपामध्ये जबाब देण्याकरीता माझे समक्ष संबंधित ठिकाणी हजर राहण्याकरीता फर्माविले आहे. परंतु सदर अपचारी यांनी रजिष्टर पोष्टाव्दारे पाठविलेल्या नोटीस परत पाठविल्या आहेत. चौकशीला त्यांनी कोणत्याच प्रकारचे सहकार्य केले नाही.

**C) सादर केलेले जबाब :**

नियम ७२ (२) च्यां नोटीसेस संस्थेच्या तत्कालीन अधिकारी व पदाधिकारी यांना दिलेल्या आहेत. त्यांनी सदरच्या नोटीसेस ह्या परत पाठविल्या असून त्यांनी त्यांचे लेखी जबाब अभिलेखावर सादर केले नाहीत. परंतु त्यांनी दिनांक १९ ऑक्टोबर २०२३ रोजी पाठविलेल्या पत्रामध्ये कलम- ८८ च्या चौकशीला सहकार्य करता येणार नाही. असे नमुद केलेले आहे. सदरचे पत्र हे **निशाणी क्रमांक ०३** वर आहे.

D) तक्रारदाराचे म्हणने :

सदर संस्थेचे तक्रारदार श्रीमती वर्षा शेनॉय यांनी चौकशी दरम्यान अभिलेखावर अर्ज सादर करुन चौकशीमध्ये त्यांची बाजु मांडण्याकरीता संधी देण्यात यावी अशी विनंती केली. सदरचा अर्ज हा निशाणी क्रमांक ०५ वर आहे. तसेच सदर अर्जासोबत त्यांनी काही महत्त्वाची दस्तऐवज अभिलेखावर सादर केली आहेत. त्या दस्तऐवजांना अनुक्रमे निशाणी क्रमांक ६ ते १४ देण्यात आलेला आहे. त्यांनी केलेली तक्रार सिध्द होण्यासाठी महत्त्वाच्या दस्तऐवजांचा त्यामध्ये समावेश आहे. त्यांच्या विनंतीनुसार त्यांना त्यांची बाजु मांडण्याकरीता नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार संधी देण्यात आलेली आहे.

उलटपक्षी संस्थेनी चौकशीला कोणत्याही प्रकारचे सहकार्य न करता पत्र देऊन त्यामध्ये असे नमुद केले आहे की, सदरच्या कलम-८८ च्या चौकशी संदर्भात सहकार्य करता येणार नाही. सदरचा अर्ज हा निशाणी क्रमांक ०३ वर आहे.

## भाग दुसरा

A] आरोपपत्र :

सदर संस्थेच्या ज्या अधिकाऱ्यांनी / पदाधिकाऱ्यांनी / संचालकांनी तसेच कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर करुन संस्थेच्या पैशाचा, निधीचा दुरुपयोग करुन सकृत दर्शनी संस्थेला जे नुकसान व तोटा पोहचविला आणि नियम ७२ अन्वये ज्या ज्या व्यक्तींनी संस्थेच्या व्यवस्थापनात भाग घेतला अशा सर्वांना नियम ७२ (२) ची नोटीस बजावली आहे आणि त्यांना त्यांचे जबाब सादर करण्याकरीता अनेक तारखा देवून संधी देण्यात आल्या होत्या. ज्यांनी लेखी म्हणणे दाखल केलेले आहेत त्यांची छाननी करुन, संस्थेनी दाखल केलेले सर्व कागदपत्रे तसेच सदर संस्थेच्या चौकशीचा अहवाल यावरून संबंधित व्यक्तिंवर नियम ७२ (३) नुसार **अंतिम आरोपपत्र दि. २५/११/२०२३** रोजी तयार करण्यात आलेले आहे, त्याला **निशाणी क्रमांक १६** देण्यात आलेला आहे. आरोपपत्रानंतर संबंधितांना त्यांची बाजू मांडण्यासाठी व बचावार्थ दस्तऐवज दाखल करण्यासाठी बऱ्याच संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

सदर आरोपपत्रामध्ये असे नमुद केले आहे की, परिशिष्ठ-अ मधील मुद्दयांला अनुसरून झालेले नियमबाह्य कार्य, अफरातफर तसेच अयोग्य कृत्य, विश्वासभंग केल्यामुळे सर्व कृत्यास वैयक्तिकरित्या व संयुक्तिकरित्या सदर रकमेस सर्व संचालक मंडळ तसेच अधिकारी / पदाधिकारी / कमर्चारी जबाबदार असल्याचे म्हटले आहे.

**B] उलट तपास :**

सदर संस्थेचे तत्कालीन अपचारी यांनी साक्षीदार लेखापरिक्षक श्री. ज्ञा.प्र.टेकवडे यांचा उलट तपास घेण्याकरीता दिनांक ०८/०१/२०२४ रोजी संधी दिली आहे. सदर दिवशी साक्षीदार उलट तपासणीकरीता हजर झाले होते. साक्षीदार यांना दिनांक २९/१२/२०२३ रोजीचे उलट तपासणीकरीता हजर राहण्याकरीता पत्र दिले होते. सदरचे पत्र हे निशाणी क्रमांक १७ वर आहे. साक्षीदार यांनी दिनांक ०८/०१/२०२४ रोजीचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर सादर केले आहे. त्यामधील मजकुर बरोबर व खरा असल्याचे त्यांनी उलट तपासणी दरम्यान सांगीतले आहे. सदरच्या पुराव्याला निशाणी क्रमांक १८ देण्यात आली आहे.

**C] युक्तिवाद :**

सदर चौकशीमध्ये सर्व अपचारींना युक्तिवादाकरीता संधी दिल्या आहेत. दिनांक २०/०१/२०२४ रोजी सदरचे प्रकरण युक्तिवादाकरीता ठेवण्यात आले होते परंतु सदर दिवशी अपचारी यांनी युक्तिवाद केला नाही. त्यामुळे सदरचे प्रकरण हे दिनांक २७/०१/२०२४ रोजी आदेशाकरीता ठेवण्यात आलेले आहे.

## भाग तिसरा

**A) रोजनामा :-**

सदर चौकशीच्या सुनावणीचा तसेच सुनावणीच्या दिवशी झालेल्या घटनांचा तपशील रोजनाम्या मध्ये नमुद केलेला आहे. रोजनाम्याची सुरुवात **दि.०४/१०/२०२३** रोजी सुरु करुन **दि.२७/०१/२०२४** ला बंद झाली व **दि. २७/०१/२०२४** रोजी आदेश पारीत केला. कागदपत्रांच्या यादी मध्ये संपूर्ण चौकशीचा रोजनामा दाखल केलेला आहे. त्याचा **निशाणी क्र. ५२** आहे. सदर चौकशीमध्ये दाखल झालेली कागदपत्रे, व चौकशी दरम्यान कार्यालयीन कागदपत्रे यांना निशाणी क्रमांक देण्यात आलेले आहेत. रोजनाम्यावरून सबंध चौकशीचा आढावा घेता येतो.

**B) कागदपत्राची यादी :-**

सदर अहवालासोबत कागदपत्रांची यादी जोडलेली आहे. त्यामध्ये चौकशीमध्ये संबंधित असणारे तसेच संबंधित व्यक्तींनी आणि संस्थेने सादर केलेले जबाब, पुरावे, आणि महत्वाचे दस्ताऐवज आहेत.सदर यादीला **निशाणी क्र. ५३** देण्यात आलेला आहे.

C) **चौकशीच्या सुनावणी :-**

संस्थेच्या चौकशीची सुरुवात **दि.०४/१०/२०२३** रोजी करुन **दि. २७/०१/२०२४** रोजी बंद केली आणि **दि. २७/०१/२०२४** रोजी आदेश पारीत करून संपविली आहे. चौकशीच्या सुनावणीच्या तारखा पुढीलप्रमाणे आहेत.

दिनांक ०४/१०/२०२३ , १२/१०/२०२३, २९/१०/२०२३, ०४/११/२०२३, १८/११/२०२३, २०/११/२०२३, २५/११/२०२३, ०८/१२/२०२३, १८/१२/२०२३, २९/१२/२०२३, ०८/०१/२०२४, २०/०१/२०२४ व २७/०१/२०२४ इत्यादी. त्याचप्रमाणे चौकशी दरम्यान इतरही दिवशी चौकशीचे कार्यालयीन कामकाज केलेले आहे.

D) **कागदपत्रांना निशाणी क्रमांक :-**

या अहवालासोबत कागदपत्रांची यादी जोडलेली आहे. त्यामध्ये जे कागदपत्र नमुद केलेले आहेत त्यांना निशाणी क्रमांक देण्यात आलेला आहे. ते यादीनुसार त्याचप्रमाणे रोजनाम्यामधील विश्लेषणावरून स्पष्ट होते.

## भाग चौथा

A) **आरोपपत्र निश्चिती नंतर कामकाजाचा तपशील :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ७२ च्या तरतुदीस अनुसरुन एकूण संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देवून त्यांना योग्य ती संधी देण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन संबंधितांना सुनावणीच्या वेळी दाखल केलेले त्यांचे लेखी जबाब व संस्थेने उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे यांचा एकत्रित आढावा घेवून ज्यांच्या गैरकृत्यामुळे संस्थेस नुकसान पोहचलेले आहे अशा संबंधित व्यक्तिंना बचावार्थ त्यांची बाजू मांडण्याकरीता भरपूर संधी उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

महाराष्ट्र सहकारी नियम १९६१ चे नियम ७२ (३) च्या नोटीसेस दोषी असणाऱ्या संबंधितांना पाठवून नियम ७२ (४) व (५) नुसार सुनावणी घेतलेल्या आहेत. त्यानुसार त्यांना माझे समक्ष हजर राहण्यासाठी सुनावणीची तारीख निश्चित करण्यात आलेली होती.

साक्ष देण्यासाठी लेखापरिक्षक श्री. ज्ञा.प्र.टेकवडे यांना यांना दिनांक २९/१२/२०२३ रोजीचे पत्र देऊन **दिनांक ०८/०१/२०२४** रोजी नमुद ठिकाणी व वेळी हजर राहण्यास फर्माविले होते. सदरचे पत्र हे **निशाणी क्रमांक १७** वर आहे.

B) नियम ८२- ५ आणि ६ नुसार :

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ८२- (५) व (६) नुसार दोषींना अनेक वेळा संधी देवून त्यांचे लेखी म्हणणे घेतलेले आहेत. त्याचप्रमाणे त्यांना तोंडी म्हणणे मांडण्यासाठी सुध्दा अनेक संधी दिल्या आहेत ज्याची सविस्तर माहिती रोजनाम्यामध्ये आहे.

हे सर्व झाल्यानंतर दुरुस्तीकरीता सर्व दोषींना संधी दिल्या आहेत आणि त्यानंतर आदेशाकरीता सदर चौकशी ठेवण्यात आली आहे.

C) सदर चौकशीमध्ये दोषी आढळलेले :-

सदर संस्थेच्या झालेल्या गैरव्यवहार व अफरातफरीस तत्कालीन अधिकारी व कर्मचारी हे वैयक्तिकरित्या व संयुक्तिकरित्या जबाबदार आहेत त्यामध्ये **श्री. दत्तात्रय बापूराव चौरे, श्री. विनोद रामकृष्ण पवार, श्री. प्रवीण अशोक पोटफोडकर, श्री. विजय [illegible] बांदल, श्री. गिरीश बन्सीधर कुलकर्णी, श्री. योगेश दिलीप पानसे, श्री. किशोर [illegible] जाधव, श्री. राजेंद्र सिद्राम भोसले, श्री. विनायक तानाजी तरकुंडे यांचा समावेश आहे**

उपरोक्त अपचारींवर आरोप हे सिध्द झालेले असल्यामुळे व त्यांचा प्रत्यक्षपणे संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये भाग असल्यामुळे त्यांना दोषी ठरविण्यात आलेले आहे.

तत्कालीन अधिकारी व पदाधिकारी यांचेवर आरोप सिध्द झाले आहेत. त्याचे सविस्तरपणे वर्णन हे निष्कर्षामध्ये नमुद करण्यात आलेले आहे. त्याचे अवलोकन करावे. अभिलेखावरील सर्व निशाणी क्रमांक दिलेल्या दस्तऐवजांचे सुध्दा सविस्तरपणे अवलोकन करावे

## चौकशीचे मुद्दे

१) आरोप क्र. १ : संस्थेचे खजिनदार सदानंद पाध्ये यांना रु. २,८०,०००/- व सचिव [illegible] यांना रु. ३,२५,०००/- असून रु. ६,०५,०००/- मानधन दिनांक ०१/०४/२०१० ते ३१/०३/२०२० या कालावधीत दरमहा रु. ५,०००/- प्रमाणे नियमबाह्यरित्या अदा करण्यात आले आहेत.

२) आरोप क्र. २ : संस्थेने जागा मालकीची नसताना बिल्डरचे जागेवर रु. १,०२,१८१/- इतके खर्च करून कंटेंजन न घेता तसेच त्याकरीता आर्किटेक्ट प्लॅन, इस्टिमेट, बांधकाम परवानगी इत्यादी बाबत संस्थेमध्ये ठराव न घेता सदरची रक्कम बांधकामावर खर्ची केली आहे.

३) आरोप क्र. ३ : संस्थेच्या मालकीचे ओपन स्पेस हे विविध कंपन्यांना भाड्याने देऊन त्यांच्याकडून भाडे वसुली चालू आहे परंतु सदरच्या भाडे वसुली रक्कमेचा आर्थिक पत्रकामध्ये कुठेच उल्लेख आढळून येत नाही.

४) आरोप क्रमांक ४ : रस्ते डांबरीकरणाकरीता रु. १७,२९,३५८/- इतका खर्च संस्थेकडून नियमबाह्य करण्यात आलेला आहे. याबाबत कोटेशन अधिकृत बिले घेण्यात आलेली नाहीत. सदरच्या खर्चाची नोंद ही ताळेबंदाला घेण्यात आलेली नाही.

अभिप्राय :

उपरोक्त मुद्दा क्रमांक १ ते ४ चा एकत्रितपणे अभिप्राय पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

सदर संस्थेचे तक्रारदार श्रीमती वर्षा शेनॉय यांनी चौकशी दरम्यान अभिलेखावर महत्त्वाची दस्तऐवजे सादर केली आहेत. सदरच्या अर्जाला व दस्तऐवजांना अनुक्रमे ५ ते १४ निशाणी क्रमांक देण्यात आलेला आहे. त्यामध्ये तक्रार अर्ज, कागदपत्राची यादी, लेखापरिक्षण अहवाल, कलम - ८३ चा चौकशी अहवाल इत्यादी महत्त्वाची दस्तऐवजे आहेत. सदर दस्तऐवजावरुन असे सिध्द होते की, सदर संस्थेचे अधिकारी व पदाधिकारी यांनी चाचणी लेखापरिक्षणानुसार व कलम-८३ च्या चौकशी अहवालानुसार गैरव्यवहार व अफरातफर करुन संस्थेचे आर्थिक नुकसान केलेले आहे. संस्थेनी चौकशीला कोणत्याही प्रकारचे सहकार्य केले नाही. तसेच अभिलेखावर मागणी करुन सुध्दा चौकशी अधिकारी यांना दस्तऐवज सादर केले नाहीत. तसेच सर्व अपचारी यांनी रजिष्टर पोष्टाने पाठविलेल्या नोटीस परत पाठविल्या.

संस्थेचे चाचणी लेखापरिक्षण श्री. ज्ञा.प्र.टेकवडे यांनी केलेले आहे. सदरचा लेखापरिक्षण अहवाल हा निशाणी क्रमांक ०९ वर आहे. त्यानुसार साक्षीदार म्हणून त्यांना पत्र दिले आहे. सदरचे पत्र हे निशाणी क्रमांक १७ वर आहे. दिनांक ०८/०१/२०१४ रोजी उलट तपासाकरीता सुनावणी ठेवली असता साक्षीदार हजर झाले व त्यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर सादर केले. जे निशाणी क्रमांक १८ वर आहे. लेखापरिक्षण अहवालामधील मजकुर हा बरोबर व खरा असल्याचे त्यांनी त्यामध्ये म्हटले आहे.

संस्थेला दिनांक ११/१०/२०२३ रोजीचे चौकशीकामी लागणारे दस्तऐवजांकरीता रजिष्टर पोष्टाने पत्र पाठविलेले आहे. सदरचे पत्र हे न स्विकारता संस्थेनी परत पाठविले आहे. सदरच्या परत आलेल्या पोष्टाच्या पाकीटवर अनक्लेम म्हणून रिमार्क आहे. सदरचे परत आलेले पाकीट हे निशाणी क्रमांक १५ वर आहे.

तसेच सदर संस्थेची कलम - ८३ ची चौकशी ॲड. धनंजय सिंहासने यांनी केलेली असून, त्यामध्ये त्यांनी सदर संस्थेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याचे सुचीत केले आहे. सदरचा चौकशी अहवाल हा निशाणी क्रमांक १४ वर आहे. अशाप्रकारे अभिलेखावरील दस्तएवजावरुन अपचारींवरील आरोप सिध्द झालेले आहेत.

निष्कर्ष :

उपरोक्त अभिलेखावरील सर्व दस्तऐवजांचे एकत्रितपणे अवलोकन केले असता असे निदर्शणास येते की, सदर संस्थेचे अधिकारी व पदाधिकारी यांनी संस्थेमध्ये गैरव्यवहार व अफरातफर केली अल्यासाचे सिध्द होत असल्यामुळे त्यांचेवर जबाबदारी निश्चित होते.

यामध्ये श्री. दत्तात्रय बाबुराव चोंधे, श्री. जितेंद्र रामकृष्ण पवार, श्री. अमीत अशोक पोहणकर, श्री. विजय नारायण बांधल, श्री. गिरीश बन्सीधर कुलकर्णी, श्री. योगेश दिलीप पानसे, श्री. किशोर भालचंद्र आढाव,, श्री. राजेंद्र हिंदुराव भोसले, श्री. विनायक यशवंत थरकुडे, इत्यादी अपचारींचा समावेश आहे.

आरोप पत्रामधील उपरोक्त मुद्दा क्रमांक १ ते ४ मधील संपूर्ण गैरव्यवहार व अफरातफरीच्या रकमेस खालील तत्कालीन संचालक हे संयुक्तिक व वैयक्तिकरित्या जबाबदार आहेत.

**B) चौकशीचा खर्च :**

चौकशी कामाकरीता आलेला खर्च आणि मेहनतनामा जो मा. उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचेकडून ३००००/- रुपये मंजूर झालेले आहेत ती रक्कम सदर चौकशीमध्ये दोषी असलेल्यांकडून वैयक्तिकरित्या १५ टक्के व्याजासह वसूल करण्याचे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व त्याखालील नियम ७२ मधील तरतुदीस अनुसरुन मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी **ॲड.रामेश्वर बळीराम खोंड, प्राधिकृत चौकशी अधिकारी, सौदामिनी सहकारी गृहरचना संस्थांचा सहकारी संघ मर्या. कोथरुड, पुणे,** पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे. अभिलेखावर उपलब्ध असलेल्या दस्तऐवजानुसार सकृत दर्शनी अवलोकन केले असता अपचारींवर वैयक्तिकरित्या व संयुक्तिकरित्या आरोप सिध्द झालेले आहेत. त्यांची नावे व रक्कम वसुलीच्या परिशिष्टामध्ये नमुद आहे.

सदरचा आदेश आज दि. **२७/०१/२०२४** रोजी **पुणे** मुक्कामी माझे सही शिक्यानिशी निर्गमित केला आहे.

**ठिकाण : पुणे**
**दिनांक : २७/०१/२०२४**

प्राधिकृत चौकशी अधिकारी
क. ८३/८८
ॲड. आर. बी. खोंड

— Sd.
**ॲड. आर.बी.खोंड**
प्राधिकृत चौकशी अधिकारी,
कलम ८८
**सौदामिनी सहकारी गृहरचना संस्थांचा सहकारी संघ मर्या. कोथरुड, पुणे,**

True copy
01.02.24
Page no. 01 to 09

## वसुलीचे परिशिष्ट

**सौदामिनी सहकारी गृहरचना संस्थांचा सहकारी संघ मर्या. कोथरुड, पुणे,**

चौकशी क्रमांक : १४४१/२०२३

वसुलीच्या परिशिष्ठामध्ये नमुद असलेल्या अपचारींकडून रक्कम १५ टक्के व्याजाने गैरव्यवहार झाल्याच्या दिनांकापासून वसूल करण्याचे आदेश पारीत केलेला आहे. त्या दोषींची नावे आणि रक्कम पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | नांव | रक्कम |
|---|---|---|
| ०१. | श्री. दत्तात्रय बाबुराव चोंधे | ३,५९,६१५/- |
| ०२. | श्री. जितेंद्र रामकृष्ण पवार | ३,५९,६१५/- |
| ०३ | श्री. अमीत अशोक पोहणकर | ३,५९,६१५/- |
| ०४. | श्री. विजय नारायण बांधल | ३,५९,६१५/- |
| ०५. | श्री. गिरीश बन्सीधर कुलकर्णी | ३,५९,६१५/- |
| ०६. | श्री. योगेश दिलीप पानसे | ३,५९,६१५/- |
| ०७. | श्री. किशोर भालचंद्र आढाव | ३,५९,६१५/- |
| ०८. | श्री. राजेंद्र हिंदुराव भोसले | ३,५९,६१५/- |
| ०९. | श्री. विनायक यशवंत शरकुडे | ३,५९,६१९/- |
| | एकूण | ३२,३६,५३९/- |

(अक्षरी रूपये बत्तीस लाख छत्तीस हजार पाचशे एकोणचाळीस फक्त)

सदर्हू आदेश दि. २७/०१/२०२४ रोजी पुणे मुक्कामी माझे सही शिक्क्यानिशी पारीत केला आहे.

-Sd-

ठिकाणी : पुणे

दिनांक : २७/०१/२०२४

(शिक्का: प्राधिकृत चौकशी अधिकारी, क. ८३/८८, ॲड. आर. बी. खोंड)

ॲड. आर.बी.खोंड
प्राधिकृत चौकशी अधिकारी,
कलम ८८
**सौदामिनी सहकारी गृहरचना संस्थांचा सहकारी संघ मर्या. कोथरुड, पुणे,**

True copy
01.02.24
Page No. 01-4009 [9]